सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२६ | सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**निवेदन**

सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ अर्थात प्रजासत्ताक दिनानिमित्त आज कार्यालय बंद राहील. त्यामुळे मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

-संपादक

**आजचे अभीष्टचिंतन**





डॉ. महेश्वर रेड्डी
पोलीस अधीक्षक, जळगाव



श्री. कैलास महाजन
व्यवस्थापक, श्री मंगळ ग्रह मंदिर



श्री. अक्षय शिंपी
पोलीस दल, अमळनेर



श्री. राजेंद्र पाटील
कला शिक्षक,



श्री. संदेश पारख
अमळनेर



श्री. विजय कुडे
निवृत्त बँक अधिकारी



श्री. संदीप सोनवणे
पत्रकार

**दिनविशेष**
२६ जानेवारी

- प्रजासत्ताक दिन
- आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क दिन
- स्वच्छ ऊर्जा आंतरराष्ट्रीय दिन
- मुंबई आणि कलकत्ता दरम्यान रेल्वे सेवा सुरू झाली.
- भारतीय संविधानाचा पहिला मसुदा मंजूर झाला.

# ढेकू रस्त्यावरील तलाठी कॉलनीत दूषित पाणीपुरवठा; आरोग्य धोक्यात

## पालिकेचे दूर्लक्ष; तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ढेकू रोड परिसरातील तलाठी कॉलनीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत आहे. नळांना अक्षरशः फेसाळ पाणी येत आहेत. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. पालिकेकडे वारंवार तक्रारी करूनही पालिकेचे याकडे दूर्लक्ष आहे. याबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. पालिकेने तत्काळ याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नगारिकांनी केली आहे.



गेल्या पाच दिवसांपासून नळाला येणाऱ्या पाण्याला फेस येत आहे. त्या पाण्यातून तीव्र दुर्गंधी येत असल्याने हे पाणी पिण्यास योग्य नाही, असा तज्ज्ञांनी इशारा दिला आहे. नागरिकांनी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नाही. पालिकेचे कर्मचारी केवळ पाहणीसाठी येऊन थातुरमातुर दुरुस्ती करून निघून जातात. मात्र, पाण्याच्या पुरवठ्यातील मूळ समस्या अद्याप कायम असून पाण्याच्या गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली नाही. दूषित पाणीपुरवठ्यामुळे कॉलोनीतील लहान मुले, वृद्ध तसेच रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. काही नागरिकांना बाहेरून पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भूर्दंडही पडत आहे.

> दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न अनेक दिवसापासून भेडसावत आहे. पालिकेकडे याबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्यापही पालिकेने याकडे लक्ष दिलेले नाही. अनेक वृत्तपत्रांनीही या समस्येची दखल घेतलेली आहे. पालिकेने आता तरी गांभिर्याने लक्ष देवून ही समस्या तातडीने सोडवावी.
>
> **–विनोद पाटील, रहिवासी, तलाठी कॉलनी.**

पालिकेने या समस्येकडे तातडीने गांभीर्याने लक्ष देऊन पाणीपुरवठा यंत्रणेची सखोल तपासणी करावी. नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी तलाठी कॉलनीतील नागरिकांनी केली आहे. होणाऱ्या दूषित पाणीपुरवठामुळे गंभीर साथीचे आजार बळावल्यास यास जबाबदार कोण? असा प्रश्नही नागरिकांनी केला आहे.




## प्रजासत्ताक दिनानिमित्त आज देशभक्तीचा जागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम सोमवार, दि. २६ जानेवारी सकाळी रोजी येथील पालिका माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात होईल. विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून देशभक्तीचा जागर होणार आहे.

प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल. यावेळी खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, लोकनियुक्त नगरध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ध्वजवंदनप्रसंगी शेकडो तिरंगी बलून आकाशात सोडून तिरंग्याला सलामी देण्यात येणार आहे. शहरातील विविध शाळांचे देशभक्तीपर नृत्य, कौशल्य, सामाजिक प्रबोधन यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. स्वातंत्र्यसैनिक, त्यांचे कुटुंबीय आणी– बाणी काळातील कारावास भोगलेले नागरिकांचा व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान होणार आहे. नागरिकांसह विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी केले आहे.



अमळनेर : तिळ– गूळ कार्यक्रमप्रसंगी वेदघोष करताना पाठशाळेतील विद्यार्थी. शेजारी उपस्थित मान्यवर.

## ब्राह्मण महासंघातर्फे तिळ– गूळ कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: येथील विविध ब्राह्मण संस्थांतर्फे शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी वाडी संस्थानमधील भक्तनिवासात तिळ– गूळ समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात झाला. याप्रसंगी सुमारे २०० हून अधिक समाजबांधव उपस्थित होते. डॉ. सुहास देशमाने व सौ. मृणाल देशमाने प्रमुख अतिथी होते.

अभयशास्त्री व वेद पाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी वेदघोष करून परशुराम भगवान प्रतिमेचे पूजन केले. यावेळी ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. शशांक जोशी व शु. यजुर्वेदी ब्राह्मण संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ प्रभाकर जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. सौ. पूर्वा वशिष्ठ सौ. सुरश्री वैद्य, श्रीमती नयना कुलकर्णी यांनी सुमधुर गीतांचे सादरीकरण केले. श्रीमती स्नेहा एकतारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पालखे यांनी सूत्रसंचालन केले. ब्राह्मण समाजाच्या महिला अध्यक्षा डॉ. अपर्णा मुठे, ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष सोमनाथ ब्रम्हे, ज्ञानेश्वर पाठशाळेचे अध्यक्ष सुनील जोशी, पुरोहित संघाचे अध्यक्ष राजेंद्र निजामपूरकर गुरुजी, डॉ. मिलिंद वैद्य, पंकज मांडे, प्रसाद जोशी, शिवा कुलकर्णी, रमेश जोशी, आदींनी सहकार्य केले. तिळ– गूळ कार्यक्रमातून विविध ब्राह्मण महासंघातील सामाजिक एकोप्याचा गोडवा निर्माण झाला.

## निवृत्त शिक्षकाला आठ लाखात गंडविले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सिंधी कॉलनीतील रहिवासी व भुसावळच्या आदर्श हायस्कूलचे निवृत्त शिक्षक माधवदास खिल्लूमल शुगानी (वय ७९) यांना एका लिंकवर क्लिक करणे चांगलेच महागात पडले आहे. सायबर चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून तब्बल ७ लाख ८९ हजार ९९२ रुपये लंपास केले आहेत. याबाबत शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी जळगाव सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. श्री. शुगाने हे आजारी असल्याने औषधांची यादी डाऊनलोड करण्यासाठी ते प्रयत्न करत होते. त्यावेळी चुकून एका अज्ञात लिंकवर त्यांनी क्लिक केले. प्रकृती बरी नसल्याने त्यांनी ती लिंक डिलीट केली आणि झोपून गेले. त्यानंतर सतत १२ दिवस प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी मोबाईल तपासला नव्हता. त्यानंतर शुगानी यांनी त्यांच्या पंजाब नॅशनल बँकेच्या खात्यातील शिल्लक तपासली, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. खात्यातील सुमारे ७ लाख ८९ हजार ९९२ रुपये गायब झाल्याचे निदर्शनास आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शुगानी यांनी तातडीने जळगाव सायबर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली आहे.

## ऑल इंडिया लिनेस क्लबच्या चेअरमनपदी डॉ. मंजिरी कुलकर्णी

### सव्वीस राज्यांमध्ये महाराष्ट्राला प्रथम बहुमान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देशातील २६ राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या अखिल भारतीय लिनेस क्लबच्या चेअरमनपदी डॉ. मंजिरी रविंद्र कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. २६ राज्यांमधून महाराष्ट्राला प्रथमच हा बहुमान प्राप्त झाला आहे.

लायन्स क्लब इंटरनॅशनलने तांत्रिक कारणामुळे लायनेस क्लब इंटरनॅशनलची लेडीज विंग लायनेस क्लब ही जगभरातील शाखा बंद करण्याचा निर्णय २०२१ मध्ये घेतला होता. त्यावेळी जगभरातील लायनेसपुढे संस्थेचे काय करावे हा एकच प्रश्न होता. त्यावेळी भारतातील हैदराबाद येथील इंदूजी महता, बेंगळुरू येथील निर्मला भंडारी, मणिपूर येथील डॉ. कोमलिनी, चेन्नई येथील सुपर्णलताजी, मुंबई येथील शशी राजपाल व अमळनेर येथील डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी नवीन संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. व सर्वांनी मोठ्या



विश्वासाने अमळनेरच्या डॉ. मंजिरी कुलकर्णी यांच्यावर फाउंडर प्रेसिडेंट म्हणून जबाबदारी सोपविली. त्यावेळी त्यांनी प्रयत्न करून "ऑल इंडिया लिनेस क्लब" या नावाने नवीन सेवाभावी संस्था स्थापन केली. २६ जुलै २०२१ रोजी संस्था स्थापनेची घोषणा केली. सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींना तोंड देत खडतर प्रवासातून कार्य सुरू केले. संस्थेची स्वतंत्रपणे घटना तयार केली. त्याप्रमाणे कार्यप्रणाली सुरू करण्यात आली. त्यानंतर भारतातील सेवाभावी संस्थांमध्ये ही संस्था रजिस्टर करण्यात आली. सुरुवातीस अगदीच मोजक्या सदस्यासह चालू केलेली ही संस्था आज भारतातील २६ राज्यांमध्ये कार्य आहे. ८ हजारांवर सदस्य आहेत.

नोव्हेंबर २०२५ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या ऑल इंडिया लिनेस क्लबच्या कॉन्फरन्समध्ये लीनेस डॉ. मंजिरी कुलकर्णी यांची चेअरमन म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा कार्यकाळ दोन वर्षाचा असून प्रथमच हा बहुमान डॉ. मंजिरी कुलकर्णींच्या रूपाने महाराष्ट्राला मिळाला आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

डॉ. मंजिरी कुलकर्णी या अमळनेरच्या दुर्गा हॉस्पिटल येथून वैद्यकीय सेवा करीत आहेत. ऑल इंडिया लीनेस क्लब या संस्थेचा परदेशातही विस्तार करून आपले कार्य सुरू ठेवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

**आठ दशकांचा ज्ञानवारसा**

# प्रताप महाविद्यालयाचे ऐतिहासिक ग्रंथालय

## एक लाख ३३ हजार ग्रंथांचा अथांग महासागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आठ दशकांचा साक्षीदार असलेले येथील प्रताप महाविद्यालयाच्या ऐतिहासिक ग्रंथालयाची सुरूवात १९४५ रोजी झली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची पहाट होत असतानाच खानदेशात ज्ञानाची एक नवीन ज्योत पेटली होती. प्रताप महाविद्यालय सुरू झाले आणि दानशूर श्रीमंत प्रतापशेठ यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या महाविद्यालयाच्या सोबतच एका भव्य 'ज्ञानयज्ञा'ची देखील सुरुवात झाली, ती म्हणजे महाविद्यालयाचे ग्रंथालय! केवळ भिंती आणि कपाटांनी नव्हे, तर विचारांनी समृद्ध झालेली ही वास्तू गेली आठ दशके अविरतपणे ज्ञानाचे दान करत आहे. हे ग्रंथालय केवळ एक खोली नसून १ लाख ३३ हजार ग्रंथांचा एक अथांग महासागर बनले आहे. राज्यभरातच नव्हे, तर संपूर्ण देशभर ज्याचा नावलौकिक आहे, असे हे सुसज्ज ग्रंथालय आहे. दुर्मिळातली दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, जाडजूड 'एनसायक्लोपीडिया' आणि विविध विषयांवरील पुस्तकांचा खजिना येथे उपलब्ध आहे. जशी नवीन पुस्तकांची भर पडत गेली, तशी वाचकांची बुद्धिमत्ताही समृद्ध होत गेली.

**शिस्त आणि तत्परता**

या दालनात पाऊल टाकताच नजरेत भरते ती येथील शिस्त. भव्य, सुसज्ज आणि देखणी



अमळनेर : ग्रंथालयाच्या पाहणीप्रसंगी प्रा. पी. टी. धर्माधिकारी, पत्रकार धनंजय सोनार व दिलीप सोनवणे.

शेकडो कपाटे सैनिकांप्रमाणे शिस्तीत उभी आहेत. विषयवार आणि क्रमवारीनुसार लावलेली पुस्तके बघून मनाला एक वेगळीच शांतता लाभते. येथील व्यवस्थापन इतके चोख आहे, की तुम्ही फक्त पुस्तकाचे नाव किंवा लेखकाचे नाव सांगा, दुसऱ्याच मिनिटाला ते पुस्तक तुमच्या हातात असेल, अशी भक्कम यंत्रणा राबविणारे ग्रंथपाल डी. आर. पाटील आणि त्यांचे सहकारी राजू बिऱ्हाडे, नरेंद्र सातपुते, दीपक माळी, श्री. सोनार व इतर कर्मचाऱ्यांची आहे. हे सध्या या ग्रंथालयाचे काम पाहत आहेत. घडवलेले दिग्गज यशाची खाण हे ग्रंथालय केवळ पुस्तकांचे घर नाही, तर अनेक दिग्गजांची जडणघडण करणारी प्रयोगशाळा आहे. येथील संदर्भ ग्रंथ वाचून, तासनतास अभ्यास करून शेकडो विद्यार्थी संशोधक झाले, 'विद्यावाचस्पती' (पीएचडी) झाले. इथूनच ज्ञान घेऊन बाहेर पडलेले प्राध्यापक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि सामाजिक कार्यकर्ते आज देश–विदेशात आणि जागतिक पातळीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत.

### काळाचा महिमा अन् एक खंत

काळाच्या ओघात सर्व काही बदलते, असे म्हणतात आणि त्याचा प्रत्यय या ऐतिहासिक वास्तूलाही येत आहे. नुकतीच या ग्रंथालयाला प्रा. पी. टी. धर्माधिकारी, पत्रकार धनंजय सोनार व दिलीप सोनवणे यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी एक हळहळ व्यक्त केली "दुर्दैवाने आता पहिल्यासारखे वाचक उरले नाहीत." आजची पिढी डिजिटल झाली आहे. विद्यार्थी येतात, त्यांना हवा तो संदर्भ मिळतो, पण ते पुस्तक हातात घेऊन वाचण्याऐवजी मोबाईलमध्ये त्याचा फोटो काढून नेतात. एकेकाळी जिथे अभ्यासूंची गर्दी असायची, तिथे आता शुकशुकाट जाणवतो. तासनतास एकाग्रतेने वाचन करणारे वाचक आता दुर्मिळ झाले आहेत, ही वस्तूस्थिती मनाला चटका लावणारी आहे. वारसा जपण्याची गरज गेली आठ दशके डौलाने उभे असलेले हे ग्रंथालय आजही त्याच मायेने वाचकांची वाट पाहत आहे. मोबाईलच्या स्क्रीनवर माहिती मिळेल, पण ज्ञानाचा खरा आनंद आणि विचारांची खोली पुस्तकांच्या पानांतच सामावलेली असते. संशोधक, विद्यार्थी आणि वाचकांनी पुन्हा एकदा या ज्ञानमंदिराकडे वळण्याची आणि हा वारसा जपण्याची नितांत गरज आहे.



सरहद से कर्तव्य पथ तक...

# २६ जनवरी पर इतिहास रचेंगी २६ साल की सिमरन

## सीमा पर गोलीबारी देखकर ज्वॉइन की थी फोर्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

२६ जनवरी को गणतंत्र दिवस की परेड में जब सिमरन बाला कर्तव्य पथ पर चलेंगी, वो कोई साधारण क्षण नहीं होगा। फोर्स के लिए, यह पल बदलती परंपराओं को दिखाएगा। यह पल वर्दी वाली महिलाओं की अगली पीढ़ी के लिए नए रास्ते खुलने का होगा। और जम्मू और कश्मीर की बदलती गौरवशाली तस्वीर का होगा।

जम्मू और कश्मीर के नौशेरा में जन्मी २६ साल की सिमरन बाला २६ जनवरी २०२६ को इतिहास रचने जा रही हैं। असिस्टेंट कमांडेंट सिमरन बाला, ७६वें गणतंत्र दिवस पर नई दिल्ली में कर्तव्य पथ पर १४० से ज्यादा पुरुष सीआरपीएफ टुकड़ी की कमान संभालेंगी। इतिहास में यह पहली बार है जब कोई महिला अधिकारी सीआरपीएफ जवानों के मार्चिंग टुकड़ी का नेतृत्व करेगी। सहरद से कर्तव्य पथ तक पहुंचने वाली सिमरन की सक्सेस स्टोरी भारतीय सेनाओं में बढ़ती नारी शक्ति की मिसाल है।

### कौन हैं सिमरन बाला? जो पुरुष सीआरपीएफ मार्चिंग दस्ते का नेतृत्व करेंगी

सिमरन बाला का जन्म १० दिसंबर १९९९ को जम्मू और कश्मीर के राजौरी जिले के बोर्डर टाउन नौशेरा हुआ था। सिमरन, देश की वो बेटी है जिसने सरहद पर रहकर भारतीय फोर्स में शामिल होने का सपना देखा और उसे पूरा किया। वे सेंट्रल रिजर्व पुलिस फोर्स (सीआरपीएफ) में असिस्टेंट कमांडेंट पद पर हैं। उनका सफर दृढ़ संकल्प और शांत हिम्मत से भरा रहा है।

### सीमा पार से होने वाली गोलीबारी देखकर ठाना था जाना है तो फोर्स में

सिमरन बॉर्डर से सटे शहर की रहने वाली हैं। उन्होंने सीमा पार (पाकिस्तान की ओर से) होने वाली गोलीबारी देखकर ठाना था कि उन्हें फोर्स में जाना है। न्यूज एजेंसी एएनआई को दिए एक इंटरव्यू में सिमरन ने कहा था, 'जम्मू और कश्मीर के सीमावर्ती क्षेत्र से होने के कारण मैंने अपने क्षेत्र में सीमा पार से गोलीबारी देखी है, इसी ने मुझे सीएपीएफ में शामिल होने के लिए प्रेरित किया। ताकि मैं सीमावर्ती क्षेत्र में भी सेवा कर सकूं।'

### सीआरपीएफ में जाने वाली जम्मू और कश्मीर की पहली लड़की

सिमरन की स्कूलिंग जम्मू में हुई, लेकिन आगे की पढ़ाई जम्मू के ही गवर्नमेंट कॉलेज फॉर वुमेन गांधीनगर से की। उन्होंने गांधीनगर कॉलेज से बैचलर डिग्री हासिल की है। अपने फाइनल सेमेस्टर में उन्होंने यूपीएससी एग्जाम की तैयारी शुरू कर दी थी। उन्होंने संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की सेंट्रल आर्म्ड पुलिस फोर्स (सीएपीएफ) परीक्षा २०२१ दी थी और पहले अटेंप्ट में ८५वीं ऑल इंडिया रैंक हासिल की थी।

इस परीक्षा का रिजल्ट जून २०२३ में घोषित किया गया था। कुल १५१ कैंडिडेट्स सेलेक्ट हुए थे जिनमें सिमरन बाला भी शामिल थीं। सिमरन बाला, यूपीएससी सीएपीएफ एग्जाम पास करके फोर्स ज्वॉइन करने वाली जम्मू और कश्मीर की पहली लड़की हैं। वे न सिर्फ अपने क्षेत्र की बल्कि देश की तमाम बेटियों के लिए रोल मॉडल बन गई हैं।

### नक्सल इलाके मिली पहली पोस्टिंग

सिमरन की जाबाजी का अंदाजा इसी बात से लगाया जा सकता है कि उनकी पहली पोस्टिंग छत्तीगढ़ के नक्सल प्रभावित जंगलों में हुई। कमीशन मिलने के तुरंत बाद वे यहां आ गई थीं और 'बस्तरिया बटालियन' में शामिल हुईं। इस बटालियन को नक्सलियों का काल कहा जाता है। क्योंकि इस बटालियन में सिर्फ वही शामिल होते हैं जो घने जंगलों और किसी भी तरह के हालात से निपटना जानते हैं

### पुरुष सीआरपीएफ टुकड़ी का नेतृत्व के लिए कैसे चुनी गईं सिमरन?

दरअसल, पहले सिमरन सिर्फ गणतंत्र दिवस की परेड का हिस्सा थीं, टुकड़ी का नेतृत्व के लिए बाद में चुनी गईं। उन्हें पुरुषों की टुकड़ी का नेतृत्व करने के लिए इसलिए चुना गया क्योंकि गणतंत्र दिवस परेड की कड़ी रिहर्सल के दौरान उनकी परफॉर्मेंस ने सीनियर अधिकारियों का ध्यान खींचा। उनका आत्मविश्वास, ड्रिल में सटीकता और टुकड़ी पर कमांड सबसे अलग था, जिससे उन्हें २६ जनवरी को सीआरपीएफ यूनिट का नेतृत्व करने का सम्मान मिला।

### नारी शक्ति और जम्मू-कश्मीर की बदलती तस्वीर एक साथ पेश करेंगी सिमरन

२६ जनवरी को गणतंत्र दिवस की परेड में जब सिमरन बाला कर्तव्य पथ पर चलेंगी, वो कोई साधारण क्षण नहीं होगा। परेड देख रहे कई लोगों के लिए, यह एक शक्तिशाली दृश्य होगा- एक युवा महिला अधिकारी सामने से नेतृत्व कर रही है, जो एक नया बेंचमार्क सेट कर रही है। फोर्स के लिए, यह पल बदलती परंपराओं को दिखाएगा, जहां नेतृत्व को पूरी तरह से योग्यता के आधार पर पहचाना जाता है। यह पल उस बदलाव का प्रतीक होगा, जिसमें वर्दी वाली महिलाओं की अगली पीढ़ी के लिए नए रास्ते खुलते रहे होंगे। यह पल भारतीय सेनाओं में बढ़ती नारी शक्ति और जम्मू-कश्मीर की बदलती गौरवशाली तस्वीर का होगा।



# इशान किशनने अवघ्या ४८ तासांत मोडला अभिषेक शर्माचा विक्रम

## अशी कामगिरी करणारा ठरला पहिलाच भारतीय फलंदाज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



इशान किशनने टीम इंडियात निवड झाल्यानंतर वादळी खेळीच्या बळावर दणक्यात पुनरागमन केले आहे. इशान किशन व सूर्यकुमार यादव यांनी दुसऱ्या टी-२० सामन्यात संघाला विजयापर्यंत नेले. सामनावीर ठरलेल्या इशान किशनने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत उत्कृष्ट फटकेबाजीचा नमुना सादर केला. इशान किशनने या दरम्यान न्यूझीलंडच्या गोलंदाजांची धुलाई करत अभिषेक शर्माला मागे टाकत त्याचा विक्रम आपल्या नावे केला.

इशान किशनने फक्त ३२ चेंडूंत ७६ धावा केल्या. मालिकेतील पहिल्या सामन्यात किशनने काही चांगले फटके खेळले. पण तो लवकर बाद झाल्याने आपल्या खेळीची छाप पाडू शकला नाही. पण दुसऱ्या टी-२० सामन्यात त्याने त्याच्या फटकेबाजीने त्याची संघातील निवड अगदी योग्य असल्याचे सिद्ध केले. या खेळीसह इशान किशनने अभिषेक शर्माचा विक्रम मोडला, जो त्याने पहिल्याच टी-२० सामन्यात केला होता.

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडियाची सुरूवात चांगली झाली नाही. दोन्ही सलामीवीर डावाच्या सुरूवातीच्या सात चेंडूंतच पॅव्हेलियनमध्ये परतले. त्यानंतर इशान किशनने कर्णधार सूर्यकुमार यादवसह आघाडी घेत एका टोकापासून जलद धावा काढण्याची जबाबदारी घेतली. या सामन्यात इशानने फक्त २१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. यासह तो न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात सर्वांत कमी चेंडूंत अर्धशतक करणारा भारताचा खेळाडू बनला. टीम इंडियाचा आक्रमक फलंदाज सलामीवीर अभिषेक शर्माच्या नावावर यापूर्वी हा विक्रम होता. ज्याने या मालिकेतील पहिल्या सामन्यात २२ चेंडूंत अर्धशतक झळकावले होते. यानंतर इशानने आता अवघ्या ४८ तासांत अभिषेकचा विक्रम मागे टाकून एक नवा इतिहास घडविला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात इशान किशनने डावाच्या पहिल्या ६ षटकांतच आपले अर्धशतक पूर्ण केले. यासह पूर्ण सदस्य संघांमध्ये पॉवरप्लेमध्ये अर्धशतक करणारा इशान किशन हा भारताचा पहिला नॉन-ओपनर फलंदाज ठरला. तर जागतिक क्रिकेटमधील पूर्ण सदस्य संघांमध्ये तो या यादीतील तिसरा खेळाडू आहे.

बापरे एवढे श्रीमंत!

# अमिताभ बच्चन यांच्या बंगल्यात सोन्याचे टॉयलेट

**नेटकरी म्हणतात बाजूला खुर्ची का पण?**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



विजय वर्मा २०१६ मध्ये अमिताभ बच्चन यांच्या घरी गेला होता तेव्हा त्याने त्यांच्या घरी एक सेल्फी काढला. हा सेल्फी बिग बींच्या बाथरूममधला होता. त्या बाथरूममध्ये सोनेरी रंगाचा कमोड होता. विजय वर्माने १७ फोटो शेअर केले. त्यापैकी एक अमिताभ बच्चन यांच्या गोल्डन शौचालयाचा आहे. त्याने कॅप्शन दिले, की २०१६ माझ्यासाठी एक मैलाचा दगड होता. मला 'पिंक' चित्रपटात बिग बी आणि शुजित दा यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. ज्यामध्ये कमाल कलाकार आणि क्रू होते. मी सचिन तेंडुलकर यांना भेटलो. मी बच्चन साहेबांच्या घरी असलेल्या गोल्डन टॉयलेटसोबत सेल्फी काढला. जीममध्ये माझी फातिमा सना शेख आणि सान्या मल्होत्रा यांच्याशी मैत्री झाली. मी माझा हिरो इरफानला भेटलो. मी 'यारा' चित्रपटात तिग्मांशू धुलिया सर, विद्युत जामवाल आणि अमित साध यांच्यासोबत काम केले. मी माझी मैत्रीण रीम सेनसोबत 'नैना बावरे' या म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आणि एकंदरीत मी माझ्या नवीन प्रसिद्धीचा पुरेपूर आनंद घेत आहे.

### अमिताभ बच्चन यांचे गोल्ड टॉयलेट

विजय वर्मा यांनी २०१६ मध्ये शेअर केलेले सर्व फोटो कमाल आहेत. परंतु अमिताभ बच्चन यांच्या बाथरूममधील गोल्डन टॉयलेटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चाहते हा फोटो पाहून आश्चर्यचकित झाले आहेत. त्यावर भरपूर कमेंट करत आहेत. एकाने लिहिले, की या फोटोंमधील मुख्य पात्र गोल्डन टॉयलेट आहे. दुसऱ्याने कमेंट केली, की विजय वर्माने पहिल्यांदाच एक आलिशान टॉयलेट पाहिले आणि त्यासोबत सेल्फी काढला. दुसऱ्याने विचारले, की ते सर्व ठीक आहे, पण टॉयलेटच्या शेजारी असलेल्या खुर्चीचा उद्देश काय आहे? मला अजूनही ते समजलेले नाही. दुसऱ्या युजरने म्हटले, की एक टॉयलेट सर्वांना मागे टाकते. अमिताभ बच्चन यांचे गोल्डन शौचालय पाहून चाहत्यांना आता खरोखरच समजले असेल, की ते किती आलिशान जीवन जगतात आणि कोट्यवधी रुपयांच्या बंगल्यात कसे राहतात. सियासतमधील एका वृत्तानुसार अमिताभ बच्चन यांची एकूण संपत्ती ३६ अब्ज रुपये आहे. ज्यामध्ये त्यांच्या इतर मालमत्ता आणि व्यवसायांचा समावेश आहे. ते एका चित्रपटासाठी १०-१२ कोटी रुपये घेतात. 'कौन बनेगा करोडपती १७' च्या एका एपिसोडसाठी त्यांनी पाच कोटी रुपये फी घेतल्याचे म्हटले जाते.

### विजय वर्माचे काम

विजय वर्मा शेवटचा २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गुस्ताख इश्क' चित्रपटात दिसला होता. आता तो 'मटका किंग' या नवीन सीरिजमध्ये दिसणार आहे, जो ओटीटी प्लॅटफॉर्म अमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे.

# वय फक्त 30... तरी हार्ट अटॅकचा धोका का वाढतोय?

## 'ही' ५ मोठी कारणे; कोणाला जास्त धोका, डॉक्टरांनी सांगितले बचावासाठी सोपे उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अलीकडच्या काळात तरुणांमध्ये हृदयविकाराच्या झटक्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचं चित्र दिसत आहे. पूर्वी हा आजार प्रामुख्याने वाढत्या वयाशी जोडला जात होता. मात्र, आता अवघ्या तीस-पस्तीस वयातही अनेक तरुणांना अचानक हृदयविकाराचा झटका येत असल्याने वैद्यकीय क्षेत्रातही चिंता व्यक्त केली जात आहे. हृदयविकाराचा झटका तेव्हा येतो, जेव्हा हृदयाच्या कोरोनरी धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होऊन हृदयाच्या स्नायूंना होणारा रक्तपुरवठा अचानक थांबतो. सामान्यतः हा अडथळा हळूहळू वाढत जातो आणि सुमारे ८० ते ९० टक्के झाल्यानंतर धोका निर्माण होतो. मात्र अलीकडे वैद्यक तज्ज्ञांच्या निरीक्षणानुसार तरुणांमध्ये केवळ ४० ते ६० टक्के अडथळा असतानाही अचानक झटका येत आहे. यामागे आजची जीवनशैली आणि शरीरात होणारे सूक्ष्म अंतर्गत बदल कारणीभूत ठरत असल्याचे सांगितले जात आहे.

एम्सचे माजी सल्लागार, साओल हार्ट सेंटरचे संस्थापक व संचालक आणि प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विमल छाजेड यांच्या मते यामागील एक प्रमुख कारण म्हणजे हृदयाच्या धमन्यांच्या आतील आवरणाची (एन्डोथेलियम) कमकुवतता. हे आवरण मजबूत आणि लवचिक असेल तर मोठा अडथळा असतानाही ते तुटत नाही. मात्र त्याची ताकद आणि लवचिकता कमी झाली तर कमी अडथळ्यावरही ते फुटू शकते. आवरण फुटताच रक्त गोठण्याची प्रक्रिया सुरू होते आणि क्षणार्धात पूर्ण अडथळा निर्माण होऊन हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

### तरुणांमध्ये हृदयविकाराच्या झटक्यामागची पाच प्रमुख कारणे

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात करिअरचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सततचा मानसिक ताण शरीरातील 'कॉर्टिसोल' संप्रेरकाचे प्रमाण वाढवतो. यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये सूज निर्माण होते, जी हृदयविकारासाठी घातक ठरते. संशोधनानुसार दीर्घकाळ टिकणारा ताण हृदयाच्या स्नायूंवर विपरीत परिणाम करतो. अतिप्रक्रिया केलेले अन्नपदार्थ आणि वाढते प्रदूषण यामुळे धमन्यांमध्ये सूज निर्माण होते. याला वैद्यकीय भाषेत 'मऊ पट्टिका' असे म्हटले जाते, जी अचानक फुटून अडथळा निर्माण करू शकते.

अपुरी झोप हा आणखी एक मोठा धोका आहे. सहा तासांपेक्षा कमी झोपेमुळे रक्तदाब आणि हृदयाची गती असंतुलित राहते. उशिरापर्यंत जागरण केल्याने हृदयाच्या स्नायूंना पुनर्बलनासाठी आवश्यक वेळ मिळत नाही. स्टेरॉइड्स आणि पूरक औषधांचा अयोग्य वापरही हृदयासाठी धोकादायक ठरतो. तसेच दिवसाचे आठ-नऊ तास सतत बसून काम करणं हे सिगारेट ओढण्याइतकेच घातक मानले जाते. यामुळे चांगल्या कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते आणि रक्त घट्ट बनते.

### कोणाला अधिक धोका असतो?

उच्च रक्तदाब, मधुमेह, वाढलेलं कोलेस्ट्रॉल, स्थूलता, धूम्रपानाची सवय आणि सततचा ताण असलेल्या तरुणांना हृदयविकाराचा धोका अधिक असतो, असे तज्ज्ञ सांगतात.


### बचावासाठी काय कराल?

नियमित शारीरिक हालचाल अत्यंत महत्त्वाची आहे. रोज तीस ते पंचेचाळीस मिनिटे चालणे, योग, सायकल चालविणे किंवा ताकदवर्धक व्यायाम केल्यास रक्ताभिसरण सुधारतं आणि हृदय मजबूत राहते. संतुलित, कमी चरबीयुक्त आहार घेणे आवश्यक आहे. फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये आणि आरोग्यदायी चरबीचा समावेश केल्यास धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्याचा वेग कमी होऊ शकतो.

ताणतणाव नियंत्रणात ठेवणे तितकेच गरजेचे आहे. ध्यानधारणा, योग, पुरेशी झोप आणि काम-जीवन समतोल यामुळे हृदयावरचा ताण कमी होतो. वेळोवेळी तपासण्या करून घेणेही महत्त्वाचे ठरते. जोखीम घटक असलेल्या व्यक्तींनी वैद्यकीय सल्ल्याने आवश्यक तपासण्या करून घ्याव्यात, जेणेकरून धोका वेळेत ओळखता येईल. तरुणांमधील वाढते हृदयविकाराचे झटके ही गंभीर इशाऱ्याची घंटा आहे. वेळीच तपासणी आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास हा धोका मोठ्या प्रमाणावर कमी करता येऊ शकतो.

# हिवाळ्यात फिट राहायचेय; 'हे' पदार्थ आत्ताच टाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपल्याला हिवाळा ऋतू आवडतो आणि तो एन्जॉय करायलाही आवडतो. हिवाळ्यात आजारपणाचे प्रमाणही जास्त असते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारे पदार्थ खाणे महत्त्वाचे ठरते. हिवाळ्यात फिट राहण्यासाठी काही पदार्थ खाण्याचे टाळणेही गरजेचे असते. चला तर जाणून घेऊया ते कोणते पदार्थ आहेत.

केळी हा 'थंड' प्रकृतीचा पदार्थ असल्याने हिवाळ्यात त्याचे सेवन आरोग्यासाठी फारसे योग्य नाही. त्यामुळे खोकला, घसा दुखणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

संत्रा, लिंबू यासारखी सायट्रस फळे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. मात्र हिवाळ्यात त्यांचे अति प्रमाणात सेवन करणे टाळावे.

हिवाळ्यात आपण चहा आणि कॉफीचे सेवन अधिक करतो. मात्र जास्त प्रमाणात कॅफिन घेतल्यास शरीरात पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन) निर्माण होऊ शकते.

अतिशय तेलकट व तळलेले पदार्थ खाणे आरोग्यासाठी अपायकारक ठरते. यामुळे पचनक्रियेत अडथळा येतो आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होऊ शकते.

हिवाळ्यात अधिक प्रमाणात मद्यपान केल्यास शरीराची आजारांशी लढण्याची ताकद कमी होते. त्यामुळे या काळात आजार पटकन जडण्याची शक्यता वाढते.

नारळपाणी हे शरीराला थंडावा देणारे व हायड्रेट ठेवणारे पेय आहे. मात्र हिवाळ्यात त्याचे अति सेवन केल्यास पचनाच्या तक्रारी, खोकला तसेच ताप येण्याची शक्यता असते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# भारतातील सर्वात प्राचीन नर्मदा नदी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

चंद्रवंशातल्या पुरुखा राजाने कडक तपश्चर्या करून शिवशंकराला प्रसन्न केले. त्याने मागितलेल्या वराप्रमाणे शिवशंकराने नर्मदेला पृथ्वीवर पाठवले, अशी तिच्या उत्पत्तीविषयी कथा सांगितली जाते, तर नर्मदा या कुमारी स्वरूपातील नदीविषयी एक वेगळीच कथा प्रचलित आहे. रविवार, दि. २५ जानेवारी रोजी नर्मदा नदी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नर्मदा नदीची विस्तृत आख्यायिका..!

मध्यप्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यात अमरकंटक या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी नर्मदा नदीचा उगम आहे. नर्मदा ही भारतातील सर्वात प्राचीन नदी मानली जाते. तिचा उगम पाच लाख वर्षापूर्वीचा आहे, असे सशोधकांचे मत आहे. नर्मदा नदी मेकल पर्वतात उगम पावून पुढे दोन मैलावर असलेल्या कडयावरून खाली पडते. या ठिकाणाला ‘ कपिलधारा ’ म्हणतात. येथे कपिलमुनींनी तपश्चर्या केली आणि सांख्यशास्त्राची रचना केली, असे मानले जाते.

मैकल पर्वतावर उगम पावली म्हणून तिला मैकलकन्या, रेवा, अमरजा, रुद्रकन्या अशीही इतर नावे आहेत. दोन्ही तीरावर अनेक क्षेत्रे असलेली नर्मदा ही भारतातील अशी एकमेव नदी आहे की फक्त तिचीच श्रद्धेने प्रदक्षिणा केली जाते. तिला नर्मदा परिक्रमा म्हणतात.

नर्मदेचा जिथे उगम झाला तिथे दगडी मंदिर बांधले असून भोवती दगडी भिंतीचा तट आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आजूबाजूला बरीच मंदिरे आहेत. मधोमध दोन मंदिरे असून पुढच्या बाजूस सरोवर आहे. एक मंदिर श्रीराम- सीतेचे असून दुसरे पश्चिमाभिमुखी मंदिर पार्वतीचे आहे. संगमरवरी पार्वतीची मूर्ती अडीच फूट उंचीची असून देवीला चांदीचा मुकुट आहे. वर अमरकंटकेश्वर महादेवाचे लिंग आहे. समोर पूर्वाभिमुख काळया पाषाणाची तीन फूट उंचीची नर्मदा मातेची मूर्ती आहे. नर्मदा माता हे देवीचे ३९वे शक्तीपीठ असून त्याला ‘ चंद्रिकापीठ’ म्हणतात.

मंदिराबाहेर कार्तिकेय, रोहिणीमाता, सूर्यमंदिर, गोरखनाथ मंदिर, सियाराम मंदिर असून पुढे यज्ञमंडप आहे. या मंडपात होमहवन केले जाते. यज्ञमंडपाच्या दगडी चार-पाच पाय-या उतरल्यानंतर त्या पाण्यात नर्मदेचे उगमस्थळ असून संध्याकाळी सात वाजता नर्मदेची आरती केली जाते. पाण्यात दिवे सोडले जातात. ते दृश्य फारच मनोहारी दिसते. हा मंदिर परिसर दीड एकराचा असून देवीचा प्रदक्षिण मार्ग दक्षिणोत्तर असा आहे. परिसरात पाताळेश्वर महादेव रंगमहाल, शंकराचार्य मंदिर, राजराजेश्वरी मंदिर, गायत्री मंदिर, आदिनाथ मंदिर, मरतडेय आश्रम, माई का बगिचा अशी अनेक दर्शनीय ठिकाणे आहेत. माई का बगिचा या ठिकाणाहून नर्मदा परिक्रमेला सुरुवात होते. रामायण काळात हे ठिकाण ऋषभ या नावाने प्रसिद्ध होते. एकदा रावण पुष्पक विमानात बसून मैकल प्रदेशातून जात असताना या ठिकाणचे निसर्गसौंदर्य पाहून तो अतिशय प्रभावित झाला. आणि काही दिवस तिथे राहून त्याने शंकराची आराधना केली. पूर्वी या प्रदेशावर प्रभू श्रीरामांचे पूर्वज रघुवंशी राजाचे राज्य होते.




दहाव्या शतकात हा प्रदेश चेदी शासकाच्या ताब्यात होता. आजही त्या काळातील मंदिरे आणि इतर भग्नावशेष दृष्टीस पडतात. कलचुरी राजाने अनेक मंदिरांची निर्मिती केली होती. चंद्रवंशातल्या पुरुखा राजाने कडक तपश्चर्या करून शिवशंकराला प्रसन्न केले. त्याने मागितलेल्या वराप्रमाणे शिवशंकराने नर्मदेला पृथ्वीवर पाठवले. अशी तिच्या उत्पत्तीविषयी कथा सांगितली जाते तर नर्मदा या कुमारी स्वरूपातील नदीविषयी एक वेगळीच कथा प्रचलित आहे. अमरकंटक नावाचा एक राजा होता. त्याला नर्मदा नावाची अतिशय सुस्वरूप अशी मुलगी होती. वयात आल्यावर राजाने तिचा विवाह शोण राजाशी ठरवला. पण त्या दोघांनी एकमेकांना कधीच पाहिले नव्हते. प्रत्यक्ष विवाहाच्या वेळीच त्यांची प्रत्यक्ष भेट होणार होती. पण विधीघटना काही वेगळीच होती. आपला मृत्यू जवळ आला आहे याची जाणीव झाल्यावर त्याने घाईघाईने नर्मदेला राज्याभिषेक करून राज्यकारभार तिच्या हाती सोपवला. नर्मदा त्या प्रदेशाची राणी झाली. पण तिचा विवाह होण्यापूर्वीच अमरकंटक राजा निधन पावला. वडिलांच्या निधनाचे दुःख काही दिवसांनी कमी झाले. तेव्हा आपण आता विवाह करावा, असा तिने विचार केला. नवरदेव ठरलेलाच होता. तिने विवाहाची सर्व तयारी करून प्रेमाचे प्रतीक म्हणून आपली अंगठी झोला नावाच्या दासीबरोबर शोण राजाकडे पाठवली. झोला शोण राजाकडे गेली आणि नर्मदेची अंगठी त्याच्यापुढे धरली. शोण राजाने नर्मदेला कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे झोला दासीच नर्मदा आहे असे समजून त्याने तिचे मोठया प्रेमाने स्वागत केले. झोला अतिशय धूर्त होती. आलेल्या संधीचा फायदा घ्यायचा तिने ठरवले आणि तिने हुबेहूब नर्मदेचे सोंग वठवले.

राजा फसला आणि झोला दासीलाच नर्मदा समजून तिच्याशी विवाह करून तिला राणीपदावर बसवले. नर्मदेने बरेच दिवस वाट पाहिली. पण शोण राजा आला नाही. तेव्हा तिने स्वतःच शोण राजाकडे जाण्याचा निर्णय घेतला. आणि त्याच्याकडे गेली. तिने पाहिले की झोला पट्टराणी बनून राजाशेजारी बसली आहे. झोलाने विश्वासघात केला हे तिच्या लक्षात आले. आपल्यासमोर एक सौंदर्यवती अनोळखी तरुणी उभी आहे हे पाहून राजाने विचारले, ‘हे सुंदर सुकुमार स्त्रिये, तू कोण आहेस?’ ‘मी कोण हे तुमच्या राणीलाच विचारावे महाराज.’ राजाने तिच्याकडे पाहिले. झोला दचकली. पण लगेच सावरून म्हणाली, ‘मला माहीत नाही. मी हिला ओळखत नाही महाराज.’ ‘ठीक आहे मी सांगते. तुम्ही जिच्याशी सोयरीक जमवलीत ती नर्मदा मी. ही झोला माझी दासी. मी प्रीतीची खूण म्हणून अंगठी हिच्याबरोबर पाठवून माझ्या राज्यात येण्याचे निमंत्रण दिले होते. पण हिने विश्वासघात केला आणि स्वतःच पट्टराणी झाली.’ ‘खरे आहे हे?’ राजाने झोलाला विचारले. ‘मुळीच नाही. हीच माझी दासी होती आणि आता नर्मदा बनून माझ्या सुखात विष कालवायला निघाली आहे. हिच्यावर मुळीच विश्वास ठेवू नका. ताबडतोब घालवून द्या हिला.’ ‘मला घालवून देण्याची मुळीच गरज नाही. मी आपण होऊनच निघून जाते आहे.’ असे म्हणून नर्मदा ताबडतोब निघाली. तिला खूप दुःख झाले होते. पण मनाशी एक निर्धार करून राजवाडयात न जाता मैकल पर्वतावर ध्यान समाधी लावली आणि शिवशंकराला प्रार्थना केली. ‘प्रभो, माझ्या देहाचे पाणी पाणी होऊ दे आणि इथून त्या जलधारा खाली वाहू देत.’ आणि तसेच झाले. त्या समाधीत नर्मदा देहरूपाने विरघळली आणि पाण्याच्या रूपाने खाली वाहू लागली. तिची नदी बनली आणि नर्मदा या तिच्याच नावाने प्रसिद्ध झाली. बरेच यात्रेकरू जगन्नाथपुरीला जाताना किंवा यात्रेहून परत येताना अमरकंटकाची यात्रा करतात.

### ‘नर्म’म्हणजे आनंद आणि ‘दा’ म्हणजे देणारी

कपिलधारापासून मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या प्रदेशातून आठशे मैल प्रवास करून गुजरातमधला (भृगुकच्छ) भडोच शहराजवळ ती पश्चिम समुद्राला मिळते. ‘नर्म’ म्हणजे आनंद आणि ‘दा’ म्हणजे देणारी अशी नर्मदा शब्दाची व्युत्पत्ती आहे.

# धरणगाव पालिकेच्या नगरसेविकापदी सौ. अंजलीताई विसावेंची विजयी हॅट्ट्रिक

## कंडारी खुर्द येथे ग्रामपंचायतीतर्फे मिरवणूक, नागरी सत्कार


ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : धरणगाव पालिकेत नगरसेविकापदी सौ. अंजनलीताई भानुदास विसावे या तिसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुक्यातील कंडारी खुर्द येथे मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी सायंकाळी त्यांची सवाद्य मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीतर्फे त्यांचा सत्कारही करण्यात आला.

सरपंच सौ. आशाबाई रामकृष्ण पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. त्यांच्या हस्ते सौ. अंजलीताई विसावे यांचा सत्कार करण्यात आला. अजबराव पाटील यांनी भानुदास विसावे यांचा सत्कार केला. सौ. अंजलीताई विसावे व भानुदास विसावे यांनी ग्रामपंचायतीचा सत्काराबद्दल ऋणनिर्देश केला. रामकृष्ण पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माजी सरपंच सुनंदा पाटील, कविता हरी पाटील, हर्षल पाटील, रवींद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य कुलदीप पाटील, विकास पाटील, जीवन पाटील, हरी पाटील, कल्याण पाटील, नाना पाटील, बाळू भिल, भूषण पाटील, संदीप पाटील, गणेश पवार, अक्षय पाटील, भागवत पाटील, सागर पाटील, अनिल पाटील, समाधान पाटील, महेश पाटील, दीपक देसले, सुभाष पाटील, किरण पाटील, एकनाथ पाटील, नाना पाटील, अर्जुन पाटील, रायसिंग भिल आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कंडारी खुर्द (ता. अमळनेर) : विजयी मिरवणुकीत चारचाकीवरून ग्रामस्थांचा ऋणनिर्देश करताना नगरसेविका सौ. अंजलीताई विसावे. दुसऱ्या छायाचित्रात नागरी सत्कारप्रसंगी उपस्थित सौ. अंजलीताई विसावे, भानुदास विसावे. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सरपंच, सदस्य व ग्रामस्थ.



# रेडिओ टॉवर झाला कुल्फी, नुडल्स हवेतच गोठले..!

## रशियाच्या थंडीने मोडले सर्व रेकॉर्ड

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रशियात थंडीने अगदी निच्चांक गाठला आहे. तापमान किती उणे असावे याचा अंदाज तुम्हाला यावरुन येईल की येथील इमारती कुल्फी सारख्या गोठल्या आहेत. मुंबईकर १६ डिग्री तापमान घसरले तरी घाबरत असतात. राज्याच्या अनेक भागात तापमान कमालीचे थंड आहे. कश्मीर आणि हिमाचलात बर्फाची चादर पसरली आहे. भारताच्या उत्तरेत थंडीमुळे कुडकुडत दातांचे आवाज यावेत अशी थंडी असताना तिकडे रशियात तर हाडे गोठवणारी थंडी म्हटले तरी वर्णन कमी पडेल अशी थंडी आहे. गेल्या साठ वर्षांच्या इतिहासात रशियात एवढी थंडी पडली आहे. रशियाची राजधानी मॉस्को संपूर्ण गोठली असून तेथे उणे २८ डिग्री तापमान घसरले आहे.

सध्या जगात बहुतांश भागात भीषण थंडी पडलेली आहे. अमेरिका, युरोप किंवा आशियातील जनजीवन सध्या हाडे गोठवणाऱ्या थंडीने विस्कळीत झाले आहे. रशियात तर सर्वाधिक बर्फवृष्टी झाली आहे. येथे साठ वर्षांतील सर्वाधिक बर्फवृष्टी झाली आहे. शहरातील अनेक भागात अनेक मीटर उंचीचे बर्फ साचले आहेत.

आर्टीक्ट येथून येणाऱ्या बर्फाळ हवेने रशियांच्या शहरात बर्फाचे डोंगर तयार केले आहेत. राजधानी मॉस्कोत भीषण थंडी पडली आहे. येथे तापमान २८ डिग्री पर्यंत घसरले आहे. या दरम्यान सोशल मीडियावर रशियातील एका उंच रेडिओ टॉवरचा फोटो व्हायरल होत आहे. ज्यात ही इमारत अक्षरशः कुल्फीसारखी गोठल्याचे दिसत आहे.

रशियात लोकांना जास्तवेळ बाहेर फिरु नका असे तेथील हवामान खात्याने म्हटले आहे. तेथील लोकांना गरम कपडे घालूनच वावरावे लागत आहे. गरम हात आणि पाय मोजे कान बंद करणारा कोट घालूनही थंडी आवरत नाही अशी स्थिती आहे. रशियात मॉस्को येथे असेच तापमान दरवर्षी उणे 28पर्यंत जात असते असे स्थानिक वेबसाईटवर म्हटले आहे. पोलर वॉर्टेक्सची कमजोरी आणि भौगोलिक रचनेमुळे रशियात शीतलहर पसरल्याचे म्हटले जात आहे.

# पुढच्या वेळी मी पण कोट घालून दावोस दौऱ्यावर..!

## मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी लगावला मिश्किल टोला

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेनंतर जळगाव जिल्ह्यात मोठे प्रकल्प येणार आहेत. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी “ पुढच्या वेळी मीही कोट घालून दावोसला जाईन, असा मिश्किल टोला लगावला.




दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेत मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करार झाले. त्यापैकी कोका-कोलाचा प्रकल्प जामनेरमध्ये तर विमानाच्या हरित इंधनाचा प्रकल्प चाळीसगावात साकारणार आहे. शेतात पिकांच्या काढणीनंतर शिल्लक राहणाऱ्या टाकाऊ अवशेषांपासून विमानांसाठी वापरल्या जाणाऱ्या हरित इंधनाची निर्मिती करणारा देशातील जागतिक दर्जाचा प्रकल्प चाळीसगाव येथे उभारला जाणार आहे. राज्यात मोठी गुंतवणूक यावी, नव्या उद्योगांना चालना मिळावी आणि तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस हे स्वतः दावोस येथे उद्योजकांशी चर्चा केली.

या दौऱ्यात चाळीसगाव तालुक्यात मोठा उद्योग यावा, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगले दर मिळावे आणि स्थानिक युवकांना रोजगार मिळावा, या उद्देशाने आमदार मंगेश चव्हाण हे देखील सहभागी होते. त्यांच्या पाठपुराव्यातून अमेरिकेतील सॅन फॅन्सिस्को येथील एका कंपनीशी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार, चाळीसगाव तालुक्यात सुमारे १५ हजार कोटींच्या गुंतवणुकीतून सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल प्रकल्प उभारण्यात येणार आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री ना. फडणवीस यांनी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत कोका- कोला कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मायकल गोल्टझमन यांची भेट घेऊन जळगाव जिल्ह्यातील जामनेरमध्ये प्रस्तावित प्रकल्पावर सविस्तर चर्चा केली. या चर्चेत प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, गुंतवणुकीचा आराखडा, रोजगार निर्मिती आणि स्थानिक विकास यासह विविध मुद्द्यांवर सकारात्मक सहमती झाली. तसेच प्रकल्पावर अधिकृतपणे शिक्कामोर्तबही करण्यात आले.

कोका- कोला सारख्या जागतिक दर्जाच्या कंपनीचा प्रकल्प जामनेरमध्ये येणे ही संपूर्ण तालुक्यासाठी आणि जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. तालुक्यातील अनेक तरुणांना स्थानिक पातळीवरच हक्काचा रोजगार मिळणार असल्याचे मंत्री ना. गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

### काय म्हणाले गुलाबराव पाटील ?

जामनेरसह चाळीसगावमध्ये जागतिक दर्जाचे प्रकल्प साकारणार म्हटल्यावर साहजिकच मंत्री गिरीश महाजन आणि आमदार मंगेश चव्हाण यांची कॉलर ताठ झाली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता एका कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस, मंत्री महाजन आणि आमदार चव्हाण यांना टोला हाणला. जळगाव ग्रामीण मतदारसंघात मोठे प्रकल्प आणण्यासाठी मलाही कोट घालून पुढच्या वेळी दावोस दौऱ्यावर जावे लागेल, असे मिश्किल वक्तव्य त्यांनी केले.

या दरम्यान, आपल्या तरुणांकडे आता नोकरी करण्याची मानसिकता उरली नाही. बिहारी माणूस येथे येऊन आपले पोट भरतो. आपण मात्र बिहारींवर टीका करतो. कशाला टीका करता, आपल्या तरुणांमध्ये काम करण्याची वृत्तीच उरली नाही हे सत्य आहे. तरुणांना माझ्या बोलण्याचा राग आला तर आला. आता चार वर्षांनी निवडणुका आहेत. तेव्हा पाहू, असेही मंत्री ना. पाटील म्हणाले.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी

एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे

मंगल पान

# शिव सहस्रनाम स्तोत्रम् – अर्थासह मराठी भावार्थानुसार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**(८१) सिद्धार्थकारी सिद्धार्थश्छन्दोव्याकरणोत्तरः।**
**सिंहनादः सिंहदंष्ट्रः सिंहगः सिंहवाहनः॥**

**अर्थ :** सिद्धार्थकारी–उद्दिष्ट पूर्ण करणारा, सिद्धार्थ–यशस्वी, छन्दोव्याकरणोत्तर–वेदवाक्यांचा अर्थ समजणारा, सिंहनाद–धर्मरक्षक घोष करणारा, सिंहग–सिंहस्वरूप धैर्यवान.

**भावार्थ :** शिव हे प्रत्येक कर्माला सिद्धी देणारे आहेत. त्यांचा 'सिंहनाद' म्हणजे धर्माचा उद्घोष. जो अधर्मावर विजय मिळवितो. ते ज्ञान, शौर्य आणि पराक्रम यांचे मूर्त स्वरूप आहेत.

**(८२) प्रभावात्मा जगत्कालस्थालो लोकहितस्तरुः।**
**सारङ्गो नवचक्राङ्गः केतुमाली सभावनः॥**

**अर्थ :** प्रभावात्मा–तेजस्वी आत्मा, जगत्कालस्थ–कालाच्या पलीकडे स्थिर, लोकहितस्तरु–सर्वांच्या कल्याणाचे वृक्ष, केतुमाली–तेजाचे धनी, सभावन–सर्व सृष्टीचा पोषक.

**भावार्थ :** शिव विश्वाच्या प्रत्येक क्षणात उपस्थित आहेत. काळाच्या बंधनात नसूनही सर्वांवर अधिष्ठित. ते लोकहिताचे कल्पवृक्ष आहेत, जे इच्छापूर्ती आणि कल्याण देतात. त्यांचे तेज केतू (ध्वज) प्रमाणे उन्नत व प्रकाशमान आहे.

**(८३) भूतालयो भूतपतिरहोरात्रमनिन्दितः।**
**वाहिता सर्वभूताना निलयश्च विभुर्भवः॥**

**अर्थ :** भूतालय–सर्व प्राण्यांचा निवासस्थान, भूतपति–सर्व प्राण्यांचा अधिपती, अहोरात्रमनिन्दित–दिवस–रात्र सर्वकाळ पूज्यनीय, वाहिता– सर्वभूतानां सर्व जीवांना धारण करणारा, निलय–सर्वांचा आधार, विभु–सर्वव्यापी.

**भावार्थ :** शिव हे समस्त प्राणिमात्रांचे निवासस्थान आणि अधिपती आहेत. तेच या जगाचे धारणकर्ते, रक्षणकर्ते आणि आधार आहेत. दिवस–रात्र, कालाच्या पलीकडेही त्यांचे अस्तित्व अखंड राहते. तेच भूत, भविष्य आणि वर्तमान या सर्वांचे केंद्र आहेत.

**(८४) वाहिता सर्वभूतानां निलयश्च विभुर्भवः।**
**अमोघः संयतो ह्यश्वो भोजनः प्राणधारणः॥**

**अर्थ :** वाहिता–सर्व प्राण्यांचे वहन करणारे, निलय–सर्वांचे निवासस्थान, अमोघ–निष्फळ नसलेले, प्राणधारण–जीवनशक्तीचे मूळ.

**भावार्थ :** शिवच जीवनाचे आधार आहेत. ते प्रत्येक जीवाला पोषण देतात आणि जीवनशक्तीचा स्रोत आहेत. त्यांची कृपा कधी व्यर्थ जात नाही. तेच 'अमोघ' आहेत.

**(८५) धृतिमान्मतिमान्दक्षः सत्कृतश्च युगाधिपः।**
**गोपालिर्गोपतिर्ग्रामो गोचर्मवसनो हरिः॥**

**अर्थ :** धृतिमान–धैर्यवान, मतिमान–प्रज्ञावान, दक्ष–कुशल, युगाधिप–काळाचा स्वामी, गोपाल–जीवनरक्षक, गोचर्मवसन–अलिप्त, विरक्त.

**भावार्थ :** शिव हे धैर्य, प्रज्ञा आणि कौशल्य यांचे अधिष्ठान आहेत. ते काळावर नियंत्रण ठेवतात आणि सर्व युगांचे नियंता आहेत. त्यांचा गोचर्मवसन रूप म्हणजे वैराग्य आणि अलिप्तता.

**(८६) हिरण्यबाहुश्च तथा गुहापालः प्रवेशिनाम्।**
**प्रकृष्टारिर्महाहर्षो जितकामो जितेन्द्रियः॥**
**अर्थ :** हिरण्यबाहु–सुवर्णतेजधारी, गुहापाल–अंतःकरणातील चेतनेचे रक्षण करणारा, जितकाम–इच्छांवर विजय मिळविणारा, जितेन्द्रिय–इंद्रियनियंत्री.

**भावार्थ :** शिव हे आत्मज्ञानाचे सुवर्णतेज आहेत. ते अंतर्मनातील गुहा म्हणजे हृदयात निवास करतात. त्यांनी काम, क्रोध, लोभ यांवर विजय मिळविला म्हणून ते खरे योगेश्वर.

**(८७) गान्धारश्च सुवासश्च तपःसक्तो रतिर्नरः।**
**महागीतो महानृत्यो ह्यप्सरोगणसेवितः॥**

**अर्थ :** गान्धार–संगीतसार, सुवास–सुगंधित, तपःसक्त–तपोमय, महागीत–ब्रह्मनादाचा गायक, महानृत्य–नटराज, अप्सरोगणसेवित–दिव्यदेवता पूजक.

**भावार्थ :** शिव हे नादब्रह्माचे स्वरूप आहेत. त्यांचे नृत्य म्हणजे सृष्टीचा लय–ताल. त्यांचा नाद विश्वाला कंपन देतो आणि सर्व देवता त्या नादात लीन होतात.

**(८८) महाकेतुर्महाधातुर्नैकसानुचरश्चलः।**
**आवेदनीय आदेशः सर्वगन्धसुखावहः॥**



**अर्थ :** महाकेतु–महातेजस्वी ध्वज, महाधातु–सर्व धातूंचा व तत्त्वांचा मूळ, नैकसानुचर–विविध स्थळांत व्यापणारा, सर्वगन्धसुखावह–आनंददायक सुगंधाचा अधिपती.

**भावार्थ :** शिव हे सर्व तत्त्वांचे मूळ आहेत. ते धातु, रत्न आणि पृथ्वीतील जीवनशक्तीचे स्रोत आहेत. त्यांचे स्मरण म्हणजे आनंददायक सुगंधासारखे शुद्धी देणारे. ते विश्वाच्या प्रत्येक तत्त्वात वास करतात.

**(८९) तोरणस्तारणो वातः परिधी पतिखेचरः।**
**संयोगो वर्धनो वृद्धो अतिवृद्धो गुणाधिकः॥**

**अर्थ :** तोरण–आश्रयद्वार, तारण–मुक्तिदाता, वात–वायूप्रमाणे सर्वत्र व्यापलेले, वृद्ध–अनुभवसंपन्न, गुणाधिक–सर्व गुणांनी युक्त.

**भावार्थ :** शिव हे तारणहार आहेत. ते जन्म–मृत्यूच्या सागरातून मोक्षाचा तोरण उघडतात. ते वायूप्रमाणे सर्वत्र असतात आणि सर्वांना जीवनशक्ती देतात. ते गुणांच्या शिखरावर असलेले सर्वश्रेष्ठ तत्त्व आहेत.

**(९०) नित्य आत्मसहायश्च देवासुरपतिः पतिः।**
**युक्तश्च युक्तबाहुश्च देवो दिवि सुपर्वणः॥**

**अर्थ :** नित्य आत्मसहाय–आत्म्याचा खरा साथी, देवासुरपति–देव–दानव दोघांचे मार्गदर्शक, युक्तबाहु–शक्तिशाली, सुपर्वण–सर्वश्रेष्ठ पंखधारी (सर्वोच्च शक्तीचा प्रतीक).

**भावार्थ :** शिव हे नित्य आत्ममित्र आहेत. जो साधकाच्या अंतर्मनातच त्यांना शोधतो. ते देव आणि असुर दोघांना न्यायाचे मार्गदर्शन देतात. त्यांची शक्ती सर्व दिशा व्यापून प्रकाश फेकते.

**(९१) आषाढश्च सुषाण्ढश्च ध्रुवोऽथ हरिणो हरः।**
**वपुरावर्तमानेभ्यो वसुश्रेष्ठो महापथः॥**

**अर्थ :** आषाढ–स्थैर्यशील, सुषाण्ढ–शौर्ययुक्त, ध्रुव–अचल व स्थिर, हरिण–मृदू व करुणामय, वसुश्रेष्ठ–सर्वश्रेष्ठ संपत्तीचा अधिपती, महापथ–जीवनमार्गाचा निर्माता.

**भावार्थ :** शिव हे स्थैर्य आणि शौर्य यांचे सुंदर मिश्रण आहेत. ते करुणेने जगाला आधार देतात आणि जीवनमार्गाचे नियमन करतात. त्यांच्यात संपत्तीचे मूळ आणि धर्माचे अंतिम लक्ष्य आहे.

**(९२) शिरोहारी विमर्शश्च सर्वलक्षणलक्षितः।**
**अक्षश्च रथयोगी च सर्वयोगी महाबलः॥**

**अर्थ :** शिरोहारी–अहंकारहरण करणारा, विमर्श–आत्मचिंतन करणारा, सर्वलक्षणलक्षित–सर्व धर्मांचे सार जाणणारा, अक्ष–चिरंतन, महाबल–असीम शक्तिशाली.
**भावार्थ :** शिव अहंकाराचे मस्तक छाटून आत्मचिंतनाचे द्वार उघडतात. ते धर्म, योग व ज्ञानाचे सर्वोच्च ज्ञाता आहेत. त्यांचे बल केवळ बाह्य नाही. ते अंतर्मनातील शक्तीचे प्रतीक आहेत.

**(९३) समाम्नायोऽसमाम्नायस्तीर्थदेवो महारथः।**
**निर्जीवो जीवनो मन्त्रः शुभाक्षो बहुकर्कशः॥**

**अर्थ :** समाम्नाय–वेदांचा मूळ स्त्रोत, तीर्थदेव–तीर्थस्वरूप, महारथ–महान योद्धा, निर्जीवो जीवन–निर्गुण असूनही सर्वांना जीवन देणारा, शुभाक्ष–शुभदृष्टीचा स्वामी.

**भावार्थ :** शिव वेदांचे स्वरूप आहेत. तेच ज्ञानाच्या सर्व तीर्थांचा आरंभबिंदू आहेत. ते निर्गुण असूनही प्रत्येक जीवाला जीवन देतात. त्यांची दृष्टी (शुभाक्ष) भक्ताच्या आयुष्याला मंगलतेने भरते.

**(९४) रत्नप्रभूतो रत्नाङ्गो महार्णवनिपानवित।**
**मूलं विशालो ह्यमृतो व्यक्ताव्यक्तस्तपोनिधिः॥**

**अर्थ :** रत्नप्रभू–दिव्य रत्नांचा स्वामी, महार्णवनिपानवित् सागराच्या रहस्यांचा ज्ञाता, अमृत–अमरत्वाचा स्रोत, तपोनिधि–तपस्येचा साठा.

**भावार्थ :** शिव हे ज्ञान, तेज आणि अमृतस्वरूप आहेत. ते सागरासारखे खोल आणि रत्नासारखे मौल्यवान आहेत. त्यांचे स्मरण हे तपोमय जीवनाचे अमृत आहे.

**(९५) आरोहणोऽधिरोहश्च शीलधारी महायशाः।**
**सेनाकल्पो महाकल्पो योगो युगकरो हरिः॥**

**अर्थ :** आरोहण–उन्नतीचा अधिपती, शीलधारी–सद्गुणांचे धारण करणारा, महायश–अखंड कीर्तीचा अधिष्ठाता, योगो युगकर–युग निर्माण करणारा.

**भावार्थ :** शिव हे शील, यश आणि योग यांचे संगम आहेत. ते प्रत्येक युगाच्या परिवर्तनाचे कारण आहेत. त्यांचे योगतत्त्व म्हणजे सर्व तत्त्वांचा संतुलित मिलाफ निर्मितीचा आधार.

**(९६) युगरूपो महारूपो महानागहनो वधः।**
**न्यायनिर्वपणः पादः पण्डितो ह्यचलोपमः॥**

**अर्थ :** युगरूप–प्रत्येक युगाचे स्वरूप धारण करणारा, महानाग–सर्वप्राण्यांचा अधिपती, न्यायनिर्वपण–न्यायनियंता, अचलोपम–पर्वताप्रमाणे स्थिर.

**भावार्थ :** शिव न्याय आणि धर्माचे सर्वोच्च प्रतीक आहेत. ते प्रत्येक युगात सृष्टीला संतुलन देण्यासाठी अवतरतात. त्यांचे स्वरूप पर्वतासारखे स्थिर आणि दैवी आहे.

**(९७) बहुमालो महामालः शशी हरसुलोचनः।**
**विस्तारो लवणः कूपस्त्रियुगः सफलोदयः॥**

**अर्थ :** बहुमाल–अनेक गुणांनी युक्त, महामाल–सर्व गुणांचा समुच्चय, शशी–चंद्रमौलिधारी, हरसुलोचन–त्रिनेत्रस्वामी, सफलोदय–यशाचा उदय करणारा.

**भावार्थ :** शिव हे चंद्रमौलिधारी ज्यांच्या नेत्रांत सूर्य, चंद्र, आणि अग्नी एकत्र तेजोमय आहेत. त्यांचे गुण समुद्रासारखे अमर्याद आहेत. त्यांचे स्मरण यश, समाधान आणि तेज प्रदान करते.

**(९८) त्रिलोचनो विषण्णाङ्गो मणिविद्धो जटाधरः।**
**बिन्दुर्विसर्गः सुमुखः शरः सर्वायुधः सहः॥**

**अर्थ :** त्रिलोचन–तीन नेत्रधारी, विषण्णाङ्ग–करुणामय, मणिविद्ध–रत्नजडित, जटाधर–तपोमय, सुमुख–प्रसन्न, सर्वायुध–सर्व आयुधांचा स्वामी.

**भावार्थ :** शिव त्रिनेत्ररूपाने ज्ञान, क्रिया आणि इच्छा या शक्तींचा अधिपती आहेत. त्यांचे करुणामय स्वरूप जगाच्या दुःखाशी एकरूप होते. त्यांची प्रसन्नता म्हणजे सर्व संकटांचे निवारण.

**(९९) निवेदनः सुखाजातः सुगन्धारो महाधनुः।**
**गन्धपाली च भगवानुत्थानः सर्वकर्मणाम्॥**

**अर्थ :** निवेदन–समर्पणाचा स्वामी, सुखाजात–आनंदमय, सुगन्धार–दिव्य सुवास देणारा, महाधनु–पिनाकधारी, सर्वकर्मणामुत्थान–सर्व क्रियांचा प्रेरक.

**भावार्थ :** शिव हे कर्म, समर्पण आणि सुख यांचे एकत्र रूप आहेत. त्यांचा पिनाक म्हणजे कर्मयोगाचे प्रतीक. ते सर्व कार्यांना प्रेरणा आणि ऊर्जा देतात.

**(१००) मन्थानो बहुलो वायुः सकलः सर्वलोचनः।**
**तलस्तालः करस्थाली ऊर्ध्वसंहननो महान्॥**

**अर्थ :** मन्थान–गती निर्माण करणारा, वायु–सर्वत्र व्यापणारा, सर्वलोचन–सर्वज्ञ द्रष्टा,
ऊर्ध्वसंहनन–उन्नत शक्तीचा धारक.

**भावार्थ :** शिव हे विश्वाच्या गतीचे प्रेरणास्थान आहेत. ते सर्वत्र वास करूनही अलिप्त आहेत. त्यांचा दृष्टिकोन सर्वोच्च जे जीवनाच्या प्रत्येक स्तराला उन्नती देतो.

**क्रमशः**

## शिवलिंग परिक्रमा



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जेथे शिवलिंगाची स्थापना केली आहे अशा शिवालयात संपूर्ण गोल प्रदक्षिणा घालायची नसते, असा नियम आहे. पण हे असे का?
आपण शिवालयात गेलो. पिंडीला नमस्कार केला, अभिषेक घातला, कुठले स्तोत्र पुटपुटले, जी कुठली आपल्याला आराधना करायची होती ती केली. मग डाव्या हाताने परिक्रमा घालायला सुरूवात केली. पण ही परिक्रमा अर्धीच घातली आणि आल्या मार्गाने तसेच परत फिरलो. भगवान शंकर यांच्या बहुतेक मंदिरांमध्ये लोकांनी पूर्ण गोल प्रदक्षिणा घालू नये म्हणून परिक्रमा मार्ग मध्येच बंद केलेला असतो. शिवलिंगाची अर्धी परिक्रमा घालण्याचा धर्माचा आदेश आहे. आपला धर्म विनाकारण आदेश देत नाही त्यामागे काहीतरी कारण असते आणि त्याही आधी आपले म्हणजेच भक्ताचे हित त्यात सामावलेले असते. शिवलिंगावर अभिषेक घातला, की तो अभिषेक जेथून बाहेर पडतो त्याला निर्मली किंवा जलधारी किंवा सोमसूत्र असे म्हणतात. त्या सोमसूत्रात काय असते? तर तेथे ऊर्जा असते आणि ही ऊर्जा अतिशय गरम आणि शक्तिशाली असते.

शिवलिंग हे शिव आणि शक्ती यांचे प्रतीक आहे. त्या पिंडीला शाळुंकेने धरून ठेवले आहे. शाळुंका म्हणजे शक्ती, जी अतिशय शक्तिशाली असते आणि जल, दूध किंवा ज्याने अभिषेक घातला आहे, तो अभिषेक जलधारीतून बाहेर पडताना ती ऊर्जा त्यात मिसळून जाते. ही ऊर्जा मानवाच्या शरीरासाठी चांगली नाही. आपण ते सोमसूत्र पायाने ओलांडले की ही ऊर्जा आपल्या शरीरात प्रवेश करते आणि त्याचा परिणाम आपल्या शरीरावर व मनावर होतो.
याचा एक श्लोक आहे–
**अर्द्ध सोमसूत्रांतमित्यर्थः शिव प्रदक्षिणीकुर्वन सोमसूत्र न लंघयेत ॥**
**इति वाचनान्तरात ।**

आता हा दोष कुठला आहे, जो सोमसूत्र ओलांडल्याने लागतो. शरीरावर असा काय परिणाम होतो? सोमसूत्र ओलांडल्याने वीर्य निर्मितीवर प्रतिकूल परिणाम होतो. आपल्या शरीरातील पाच प्रकारच्या वायूंवरही याचा वाईट परिणाम होतो. आपण जांभई देतो, ही कृती देवदत्त वायूमुळे होते तसेच धनंजय वायू, हा वायू आपल्या संपूर्ण शरीरात इकडून तिकडे फिरत असतो, शरीराचे सगळे अवयव नीट काम करावेत या प्रयत्नात हा वायू असतो आणि मृत्यूनंतरही हा वायू आपल्या शरीरात त्याचे अस्तित्व राखून असतो; या दोन वायूंच्या प्रवाहात सोमसूत्र ओलांडल्याने अडथळा निर्माण होतो. याचा परिणाम आपल्या शरीरावर आणि मनावरही होतो. म्हणून शिवलिंगाची संपूर्ण प्रदक्षिणा घालायची नाही आणि निर्मली आली की परत फिरायचे. हा नियम आहे. पण सोमसूत्रावर जर गवत, पाने, दगड, विटा, लाकूड असे काही ठेवून ती निर्मली झाकून ठेवली असेल तर सोमसूत्र ओलांडण्याचा दोष लागत नाही. पण तरीही 'शिवस्यार्ध प्रदक्षिणा' हे म्हटलेले आहे म्हणजेच शिवाची प्रदक्षिणा ही नेहमी अर्धीच घालावी.

आज श्रावण सुरू झाला, आता शिवालयात गर्दी होईल. आपण शिवाच्या ज्या पिंडीचे म्हणजेच शिवलिंगाचे दर्शन घेत आहोत त्याचा अर्थ काय आणि या पिंडीला संपूर्ण प्रदक्षिणा घालायची नाही पण याचे कारण काय, हे सांगण्यासाठी हा दोन लेखांचा खटाटोप.

**हर हर महादेव...**

# मासिक दुर्गा अष्टमी व्रत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दुर्गा अष्टमी व्रत हा दैवी शक्ती (देवी दुर्गा) ला समर्पित एक महत्त्वाचा हिंदू विधी आहे. मासिक दुर्गा अष्टमी ही हिंदू कॅलेंडरवरील प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या (उज्ज्वल चंद्र पंधरवडा) अष्टमी तिथी (आठव्या दिवशी) पाळली जाणारी मासिक घटना आहे. यंदाची पहिली दुर्गा अष्टमी २६ जानेवारी २०२६ रोजी आहे.

या दिवशी दुर्गा देवी यांच्या शस्त्रांची पूजा केली जाते. हा उत्सव अस्त्र पूजा म्हणून ओळखला जातो. शस्त्रांचे प्रदर्शन आणि इतर प्रकारच्या युद्धकलांमुळे या दिवसाला 'विराष्टमी' असेही म्हणतात. हिंदू भाविक दुर्गा देवी यांची प्रार्थना करतात आणि त्यांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी कठोर उपवास करतात.

भारताच्या उत्तर आणि पश्चिम भागात दुर्गा अष्टमीचे व्रत पूर्ण भक्तीने साजरे केले जाते. आंध्र प्रदेशातील काही भागात दुर्गा अष्टमी 'बथुकम्मा पांडुगा' म्हणून साजरी केली जाते. हिंदू धर्माच्या अनुयायांसाठी दुर्गा अष्टमीचे व्रत हे अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते.



### दुर्गा अष्टमी व्रत दरम्यान विधी

दुर्गा अष्टमीच्या दिवशी भक्त देवी दुर्गेची प्रार्थना करतात. ते सकाळी लवकर उठतात आणि फुले, चंदन आणि धूप यांच्या रूपात देवीला अनेक नैवेद्य अर्पण करतात. काही ठिकाणी दुर्गा अष्टमी व्रताच्या दिवशी कुमारी पूजा देखील केली जाते. हिंदू ६ ते १२ वर्षे वयोगटातील मुलींना दुर्गेच्या कन्या (कुमारी) रूपात पूजा करतात. देवीला नैवेद्या अर्पण करण्यासाठी विशेष नैवेद्या तयार केले जातात.

उपवास हा दिवसाचाा एक महत्त्वाचा विधी आहे. दुर्गा अष्टमी व्रताचे पालन करणारा दिवसभर खाणे–पिणे वर्ज्य करतो. पुरुष आणि स्त्रिया दोघेही हा उपवास पाळतात. दुर्गा अष्टमी व्रत आध्यात्मिक लाभ मिळविण्यासाठी आणि दुर्गा देवीचे आशीर्वाद मिळविण्यासाठी पाळले जाते. काही भक्त फक्त दूध पिऊन किंवा फलाहार खाऊन उपवास करतात. दुर्गा अष्टमी व्रताचे दर्शन घेणारे सायंकाळी शक्ती मंदिरांना भेट देतात. महाष्टमीच्या दिवशी विशेष पूजा केली जाते. ज्याचे दर्शन हजारो भाविक घेतात.

### दुर्गा अष्टमी व्रताचे महत्त्व

संस्कृतात 'दुर्गा' या शब्दाचा अर्थ 'अजिंक्य' आणि 'अष्टमी' म्हणजे 'आठ दिवस'. हिंदू पौराणिक कथेनुसार 'देवी भद्रकाली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुर्गा देवीचा भयंकर आणि शक्तिशाली रूपाचा अवतार झाला. दुर्गा अष्टमीचा दिवस 'महिषासुर' नावाच्या राक्षसावर दुर्गा देवीच्या विजयाच्या रूपात साजरा केला जातो. अशी मान्यता आहे, की जो कोणी समर्पणाने दुर्गा अष्टमीचे व्रत पाळतो त्याच्या आयुष्यात आनंद आणि सौभाग्य येते.

**अष्टमी तिथीची वेळ**
**२५ जानेवारी : रात्री ११.०० ते २६ जानेवारी रात्री ९.१८ वाजेपर्यंत.**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**